# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १४१** **दिनांक ०१/०६/२०२१**

## कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर दि १५/०६/२०२१ रोजी पावेतो मिरा-भाईंदर, वसई-विरार मनपा हद्दित मनाई आदेश लागू.

कोविड-१९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या "ब्रेक द चेन" कार्यक्रमाअंतर्गत जारी केलेल्या निर्देशास अनुसरुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोरोना आजाराचे वाढत्या संसर्गाचे पार्श्वभूमीवर फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे पुढिल निर्बंध लागू करण्यात आलेले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक १४/०४/२०२१, दिनांक २२/०४/२०२१, दिनांक ३०/०४/२०२१ व दिनांक १४/०५/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मनाई आदेशा मध्ये खालील अतिरीक्त निर्बंधांचा समावेश करण्यात आला असुन सदरचा मनाई आदेश अतिरिक्त निर्बंधासह दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा.पासुन ते दि. १५/०६/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा.पर्यंत लागु राहतील.

**शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या आदेशास अनुसरुन व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि ३१/०५/२०२१ रोजीचे पत्रानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पुढील प्रमाणे शिथिलता व नियम लागू करण्यात आले आहेत.**

अ) सर्व अत्यावश्यक सेवांशी निगडीत दुकाने ही यापुर्वी सकाळी ०७.०० ते ११.०० वाजे पावेतो चालु ठेवणेबाबत परवानगी देण्यात आली होती. ती सर्व दुकाने सकाळी ०७.०० ते १४.०० वाजे पावेतो सुरु ठेवण्यास परवानगी राहील.

ब) अत्यावश्यक सेवेशी निगडीत नसलेली दुकाने (शॉपिंग सेंटर व मॉल मधील नसलेली दुकाने व एकल दुकाने ) सकाळी ०७.०० ते १४.०० वाजे पावेतो सुरु राहतील व शनिवार व रविवार अशी दुकाने बंद राहतील.

क) जिवनावश्यक वस्तुसह इतर वस्तुंची ई-कॉमर्स सेवा देणाऱ्या आस्थापना घरपोच सेवा करु शकतात.

ड) शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या आदेशा अन्वये घरपोच सेवा देणेस परवानगी देण्यात आलेल्या सेवा तसेच वैद्यकीय इतर आपत्कालीन सेवा या दुपारी १५.०० वाजे नंतरही सुरु राहतील. त्या व्यतिरिक्त इतर हालचालींवर निर्बध राहील.

ई) सर्व शासकीय कार्यालयांमध्ये २५ टक्के उपस्थिती राहू शकेल. कोव्हिड-१९ महामारी व्यवस्थापनाशी प्रत्यक्ष सलग्न असणाऱ्या सेवांना वगळण्यात आलेले आहेत. जिल्हा व्यवस्थापन प्राधिकरण हे संबंधित खाते प्रमुखाने उपस्थिती वाढविणेबाबत विनंती केल्यास निर्णय घेऊ शकतात.

फ) कृषी क्षेत्राशी निगडीत दुकाने ही सर्व दिवशी सकाळी ०७.०० ते सायं. १९.०० वाजे पर्यंत सुरु राहतील.

**शासनाने जारी केलेल्या दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या "ब्रेक द चेन" प्रमाणे दिलेले आदेश व मा. आयुक्त, वसई विरार मनपा यांचे दि ०१/०६/२०२१ चे पत्रानुसार वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रात पुढील प्रमाणे निर्बंध लागू राहतील.**

अ) सर्व अत्यावश्यक सेवांशी निगडीत दुकाने ही यापुर्वी सकाळी ०७.०० ते ११.०० वाजे पावेतो चालु ठेवणेबाबत परवानगी देण्यात आली होती. ती सर्व दुकाने सकाळी ०७.०० ते १४.०० वाजे पावेतो सुरु ठेवण्यास परवानगी राहील.

ब) अत्यावश्यक सेवेशी निगडीत नसलेली दुकाने (शॉपिंग सेंटर व मॉल मधील नसलेली दुकाने व एकल दुकाने ) सकाळी ०७.०० ते १४.०० वाजे पावेतो सुरु राहतील व शनिवार व रविवार अशी दुकाने बंद राहतील.

क) जिवनावश्यक वस्तुसह इतर वस्तुंची ई-कॉमर्स सेवा देणाऱ्या आस्थापना घरपोच सेवा करु शकतात.

ड) शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या आदेशा अन्वये घरपोच सेवा देणेस परवानगी देण्यात आलेल्या सेवा तसेच वैद्यकीय इतर आपत्कालीन सेवा या दुपारी १५.०० वाजे नंतरही सुरु राहतील. त्या व्यतिरिक्त इतर हालचालींवर निर्बध राहील.

ई) सर्व शासकीय कार्यालयांमध्ये २५ टक्के उपस्थिती राहू शकेल. कोव्हिड-१९ महामारी व्यवस्थापनाशी प्रत्यक्ष सलग्न असणाऱ्या सेवांना वगळण्यात आलेले आहेत. जिल्हा व्यवस्थापन प्राधिकरण हे संबंधित खाते प्रमुखाने उपस्थिती वाढविणेबाबत विनंती केल्यास निर्णय घेऊ शकतात.

फ) कृषी क्षेत्राशी निगडीत दुकाने ही सोमवार ते शुक्रवार सर्व दिवशी सकाळी ०७.०० ते दुपारी १४.०० वाजे पर्यंत सुरु राहतील. शनिवार व रविवार अशी दुकाने बंद राहतील.

तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार महानगरपालिका हद्दिमध्ये माल वाहतुकीवर कोणतेही निर्बंध नसुन दुकाने व आस्थापना यांना त्यांचे मालाचा साठा पुन्हा भरण्याकरीता त्यांना लागू  केलेल्या वेळेच्या निर्बंधानंतर ही सुरु ठेवता येतील. परवानगी देण्यात आलेल्या वेळे व्यतिरिक्त कोणतेही दुकाने व आस्थापना या ग्राहकांना माल विक्री करणार नाहीत. नमुद आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना व दुकाने ही कोरोना माहामारी असे पर्यंत बंद ठेवली जातील. त्या बरोबरच शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२०२१ रोजीच्या आदेशात नमुद केले प्रमाणे दंडास देखील पात्र राहतील.

स्थानिक व्यवस्थापन प्राधिकारणाच्या परवानगीने सदर कालावधीमध्ये घरपोच सेवा चालु राहतील आणि अशा सेवा जास्तीत जास्त कालावधीकरीता चालु ठेवणेबाबत प्रोत्साहित केल्या जाव्यात.